# ‘एनआयआरएफ’ रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठ १३७ व्या स्थानी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय संस्थात्मक नामांकन (एनआयआरएफ) रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठ १३७ व्या स्थानावर आहे. विद्यापीठ रँक बँड १०१-१५० मध्ये आहे. मागील वर्षी विद्यापीठ क्रमवारीत याच क्रमांकावर होते.

नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्कमार्फत देशातील उच्च शिक्षण देणाऱ्या उत्कृष्ट शैक्षणिक संस्था आणि विद्यापीठांची यादी यंदा प्रथमच दहा विभागामध्ये जाहीर करण्यात आली. क्रमवारीसाठी देशभरातून ५,८०५ शैक्षणिक संस्थांचे अर्ज आले होते. यातून ३,७७१ संस्थांची निवड झाली. या क्रमवारीत आयआयटी मद्रासने अव्वल क्रमांक पटकावण्याबरोबरच अभियांत्रिकी गटात अव्वल स्थान मिळविले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, डी. वाय. पाटील विद्यापीठ पुणे, भारती विद्यापीठ हे शंभरमध्ये आहेत. शिवाजी विद्यापीठाला पहिल्या शंभरमध्येही स्थान मिळवता आलेले नाही. कोल्हापुरातील भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी ३९.५९ स्कोअरसह ६२ व्या स्थानावर आहे.



“

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील मूल्यमापनाच्या आधारे रँकिंग जाहीर करण्यात आली आहेत. यात विद्यापीठात असणारे परदेशी विद्यार्थी, शिक्षक यांचा विचार करण्यात आला आहे. ‘नॅक’च्या अनुषंगाने विद्यापीठाने अनेक अपेक्षित बदल केले आहेत. पुढील वर्षाच्या रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठ अग्रेसर राहील.

**- डॉ. देवानंद शिंदे,**
कुलगुरू

# शिवाजी विद्यापीठ १३७ व्या स्थानी



कोल्हापूर, ता. ११ : राष्ट्रीय संस्था मूल्यांकन यादीत शिवाजी विद्यापीठाचा क्रमांक देशात १३७ वा दिसत असला तरी याबाबत विद्यापीठाने दुजोरा दिलेला नाही. २०१७-१८ मध्ये केलेल्या मूल्यमापनावर ही यादी प्रसिद्ध करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाची गेल्यावेळीही याच क्रमांकावर वर्णी लागली होती. देशातील शैक्षणिक संस्थांचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून परीक्षण केले जाते. त्यानंतर संस्थांच्या गुणांनुसार नॅशनल इन्स्टिट्युशनल रँकिंग फ्रेमवर्कच्या माध्यमातून यादी जाहीर केली जाते. यामध्ये विद्यापीठे, आय.आय.टी., अभियांत्रिकी महाविद्यालये, महाविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय, विधी आदींचा समावेश आहे. यंदा प्रथमच दंत (डेन्टल अभ्यासक्रम) याचाही समावेश करण्यात आला आहे. या परीक्षणात विद्यापीठातील संशोधनाबरोबरच सोयी-सुविधा, परदेशी विद्यार्थी, अध्यापकांची संख्या यावरही गुण अवलंबून असतात. यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या यादीतही शिवाजी विद्यापीठाचा क्रमांक १०१ ते १५० या दरम्यान होता. यंदाही विद्यापीठाचा क्रमांक त्यादरम्यानच आहे.

**राष्ट्रीय संस्था मूल्यांकनासाठी झालेले मूल्यमापन २०१७-१८ मध्ये झाले. त्यानंतर विद्यापीठाने नॅक मूल्यांकनासाठी अनेक सुधारणा केल्या. परदेशी विद्यार्थ्यांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे २०१९-२० मध्ये मूल्यांकन होईल, त्यामध्ये गुणात वाढ होऊन क्रमांकही वाढेल.**

**- डॉ. देवानंद शिंदे**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

# विद्यापीठात सीएचबी प्राध्यापक

## नॅक मूल्यांकनाच्या तोंडावर निर्णय; प्रतितास 500 रुपये मिळणार मानधन

संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठ स्तरावर सीएचबी प्राध्यापकांची आता नियुक्ती केली जाणार आहे. महिन्याकाठी निश्चित मानधनावर काम करणाऱ्या कंत्राटी शिक्षकांची (हंगामी सहायक प्राध्यापक) अडचण झाली असून, महिन्याकाठी हातात पडणाऱ्या मानधनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एका तासिकेमागे केवळ पाचशे रुपये मिळणार आहेत. यंदा ही वेगळी प्रथा विद्यापीठाच्या उंबरठ्यावरून अधिविभागांत प्रवेश करत आहे.**



> **शासकीय नियमांप्रमाणे कंत्राटी प्राध्यापकांची भरती यंदाही व्हायला हवी. तरच त्यांचा दर्जा राखला जाईल. तासिका तत्वावरील त्यांची नियुक्ती, त्यांचे अवमूल्यन करणारी ठरेल.**
>
> **- प्रा. डॉ. एन. बी. गायकवाड,** सदस्य, व्यवस्थापन परिषद

एका वर्षाच्या करारावर कंत्राटी प्राध्यापकांची पदे भरण्यात येतात. एका प्राध्यापकाला महिन्याकाठी रोख ३२ हजार ६०० रुपये मानधन दिले जाते. विद्यापीठात या पदांचा आकडा १४४ असला तरी गतवर्षी केवळ ७९ कंत्राटी प्राध्यापक विविध अधिविभागांत कार्यरत राहिले. त्यांची मुदत मेमध्ये संपुष्टात आली. एक वर्षाचा करार असला तरी नऊ ते दहा महिन्यांत कंत्राटी प्राध्यापकांना काम करायला मिळते. कोरोनाच्या संकटात प्राध्यापकांच्या मानधनालाही कात्री लावण्यात आली. विशेषतः कायमस्वरूपी प्राध्यापकांची संख्या लक्षात घेता अधिविभागातील विविध कामांचा बोजा कंत्राटी प्राध्यापकांवर असतो. त्यातून त्यांची सुटका नसते. तासिका तत्त्वावरील पदे विद्यापीठात भरल्यास संबंधित प्राध्यापकांचा तासिकांपुरताच कार्यभार राहील. ते अन्य कामास नकारघंटा वाजवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

नॅक मूल्यांकनाच्या तोंडावर तासिका तत्वावरील प्राध्यापकांची नियुक्ती केली जाणार आहे. तसा निर्णय व्यस्थापन परिषदेत घेण्यात आला आहे. छोट्या संवर्गातील आरक्षित पदे भरण्याबाबत ऑगस्ट २०१९ ला शासनाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार कार्यवाही केली जात आहे. त्यामुळे यंदा कंत्राटी पद भरतीला स्थगिती दिली आहे. २०१५ चा विचार करता ११ महिन्यांची मुदत संपल्यानंतर एक महिन्यांचा ब्रेक देऊन प्राध्यापकांच्या सेवा पुढे सुरु ठेवल्या होत्या. तसा निर्णय विशेषाधिकाराखाली करणे शक्य असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे.

### पुढील आदेशापर्यंत कंत्राटी नियुक्तीची मागणी

शासनाकडून पुढील आदेश येईपर्यंत पूर्वीप्रमाणेच कंत्राटी प्राध्यापकांच्या नियुक्तीची अंमलबजावणी करावी. चार ते पाच वर्षे ते सेवा बजावत आहेत. अडचणीच्या काळात विद्यापीठाने प्राध्यापक व त्यांच्या कुटुंबांचा सहानुभूतीपूर्वक विचार करायला हवा, असा सूर विद्यापीठ वर्तुळात आहे.



टेंबलाईवाडी : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या लॉकडाउनमुळे विद्यार्थी गावी परतले असून, शिवाजी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांची वर्दळही कमी आहे. परिणामी मुख्य इमारतीच्या समोरील गार्डनमध्ये मोर-लांडोरांचा असा मुक्त संचार सुरू आहे. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

# विद्यापीठात मोरांचा मुक्त संचार

## विद्यार्थी, कर्मचाऱ्यांची वर्दळ कमी झाल्याचा परिणाम

**सकाळ वृत्तसेवा**

टेंबलाईवाडी, ता. ११ : शिवाजी विद्यापीठातील रस्ते, क्वॉर्टर्स, मुख्य इमारत या सर्व ठिकाणी सध्या मोर आणि लांडोर यांचा मुक्त वावर सुरू आहे. एरवी विद्यापीठाच्या गर्द झाडीमध्ये हा सुंदर पक्षी दडलेला असतो. लॉकडाउनमुळे आता ते मुक्तपणे फिरू लागले आहेत.

शिवाजी विद्यापीठाचा परिसर हा जैवविविधतेने नटलेला आहे. विविध प्रकारचे किटक, फुले, पक्षी, सरीसृप विद्यापीठात पहायला मिळतात. मोर मात्र सर्वांच्या आकर्षणाचे केंद्र असते. दिवसभर विद्यापीठ परिसरात वाहनांची, विद्यार्थी, कर्मचारी यांची ये-जा सुरू असते. त्यामुळे हा विलोभनीय पक्षी गर्द झाडीमध्ये दडलेला असतो. सकाळी आणि संध्याकाळी माणसांची वर्दळ कमी झाली की मोर, लांडोर झाडीतून बाहेर येतात. पर्यावरण विभाग, भाषा विभाग, वसतिगृह यांच्या परिसरात मोर असतात. मात्र, सध्या लॉकडाउनमुळे बरेच दिवस त्यांना माणसांची वर्दळ दिसलेली नाही. पर्यायाने ते आता विद्यापीठाच्या आवारात मुक्तपणे फिरत आहेत. मुख्य इमारतीसमोर असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याभोवती या मोर, लांडोरांचा वावर दिसू लागला आहे. खर्डेकर ग्रंथालयाच्या आवारातही मोर दिसले होते. एका अर्थाने आता संपूर्ण विद्यापीठ परिसरच त्यांचे अंगण झाले असल्यासारखे वाटू लागले आहे.

# हिरे महाविद्यालयातर्फे आज-उद्या आंतरराष्ट्रीय परिषद

गारगोटी

प्रतिनिधी

येथील मौनी विद्यापीठाच्या कर्मवीर हिरे महाविद्यालय व भूमी प्रकाशन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने १२ व १३ रोजी 'कोविड १९: प्रभाव व प्रतिसाद' या विषयावरील दोन दिवसीय ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. या परिषदेसाठी अमेरिका, दक्षिण कोरिया, आफ्रिका, रशिया, जपान, स्पेन, मलेशिया आदी देशांसह भारतातून १२०० संशोधक, शिक्षक व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील, प्रमुख संयोजक डॉ. शरदराव व्हनाळकर, डॉ. सागर व्हनाळकर व प्रा. चेतन भगत यांनी दिली.

परिषदेत शिवाजी विद्यापीठाचे शास्त्र शाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, चोन्नाम राष्ट्रीय विद्यापीठ, ग्वान्ग्झू दक्षिण कोरियाचे डॉ. जे. एच. किम, अमिरकबीर विद्यापीठ, तेहरान इराणचे आमीर मोहम्मद अब्राय, एक्झोनमोबिल कंपनीचे डॉ. अभिजित चौसाळकर, कॉक विद्यापीठ तुर्कीचे डॉ. शशी श्रीवास्तव, अमेरिकेच्या रस्ते परिवहन विभागाचे प्रमुख अभियंता डॉ. स्टीव्हन योन्कीन, आयवा विद्यापीठ अमेरिकेचे सीन रसेल, मलेशिया विद्यापीठ, मलेशियाच्या डॉ. साथियाबामा थीरुनाना, पॅसिफिक राष्ट्रीय प्रयोगशाळा वॉशिंग्टन, अमेरिकेचे संशोधक डॉ. हिमांशू शर्मा, डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणेच्या प्रा. नीलम पाटील, मोहेकर महाविद्यालय, कळंब, उस्मानाबादचे डॉ. हेमंत भगवान आदी निमंत्रित तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

**कोरोनावरील चर्चेत बाराशे संशोधकांचा सहभाग**

ही परिषद टेलिग्राम ॲप व महाविद्यालयाच्या युट्यूब चॅनेलवर आयोजित केली आहे. या परिषदेत सादर झालेल्या शोधनिबंधाचे पुस्तक भूमी प्रकाशन संस्थेच्यावतीने प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या परिषदेची सर्व तयारी झालेली असून ऑनलाईन पद्धतीने २५० वर भित्तिपत्रकांचे सादरीकरण होणार असल्याची माहिती संयोजकांनी दिली.

लोकमत



शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शेजारी डावीकडून शिवाजी जाधव, आलोक जत्राटकर, रत्नाकर पंडित, व्ही. टी. पाटील, डॉ. विलास नांदवडेकर.

# ग. गो. जाधव अध्यासनाच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन करताना महत्त्वपूर्ण आश्वासनपूर्ती केल्याचा आनंद होत आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी येथे केले.

या अध्यासनाच्या वतीने डॉ. शिवाजी जाधव लिखित 'पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांची पत्रकारिता' आणि डॉ. आलोक जत्राटकर संपादित 'पुढारी'कार पद्मश्री (कै.) डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमाला संग्रह (१९८८-२०१९)' या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमात या पुस्तकांचे आणि विद्यापीठाच्या जनसंपर्क कक्षाच्या वतीने निर्मित 'शिव-वार्ता : माध्यमांच्या नजरेतून विद्यापीठ (२०१९-२०२०)' या वार्तासंकलन पुस्तिकेचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले.


यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अध्यासनाचे समन्वयक शिवाजी जाधव, माजी चेअर प्राध्यापक डॉ. रत्नाकर पंडित, जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर उपस्थित होते.

# ग. गो. जाधव अध्यासनाच्या पुस्तकांच्या प्रकाशनामुळे आश्वासनपूर्तीचा आनंद

## शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे उद्‌गार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन करीत असताना महत्त्वपूर्ण आश्वासनाची पूर्ती केल्याचा आनंद होतो आहे, असे उद्‌गार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग.गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने डॉ. शिवाजी जाधव आणि डॉ. आलोक जत्राटकर यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. शिवाजी जाधव आदी.

विद्यापीठाच्या दिवंगत पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे डॉ. शिवाजी जाधव लिखित 'पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांची पत्रकारिता' आणि डॉ. आलोक जत्राटकर संपादित 'पुढारी'कार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमाला संग्रह (सन १९८८-२०१९)' या दोन पुस्तकांची निर्मिती करण्यात आली आहे. या पुस्तकांचे आणि विद्यापीठाच्या जनसंपर्क कक्षातर्फे निर्मित 'शिव-वार्ता: माध्यमांच्या नजरेतून विद्यापीठ (सन २०१९-२०२०)' या वार्तासंकलन पुस्तिकेचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत कुलगुरू कार्यालयात करण्यात आले. त्यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, डॉ. शिवाजी जाधव यांनी, दिवंगत पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांच्या पत्रकारितेविषयी पीएच. डी. संशोधन केले. हे संशोधान पत्रकारिता अभ्यासक, संशोधक व प्राध्यापक यांच्यासाठीही हे पुस्तक महत्त्वाचे ठरणार आहे.

# हिरे कॉलेजमध्ये आज आंतरराष्ट्रीय परिषद

गारगोटी, ता. ११ : येथील मौनी विद्यापीठाच्या कर्मवीर हिरे महाविद्यालय व भूमी प्रकाशन संस्थेतर्फे १२ व १३ जूनला कोविड १९: प्रभाव व प्रतिसाद या विषयावरील दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय ऑनलाईन परिषद होत असल्याची माहिती प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील, संयोजक डॉ. शरद व्हनाळकर, डॉ. सागर व्हनाळकर, प्रा. चेतन भगत यांनी दिली. परिषद टेलिग्राम ॲप व महाविद्यालयाच्या यूट्यूब चॅनेलवर होणार आहे

शिवाजी विद्यापीठाच्या शास्त्र शाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, चोन्नाम राष्ट्रीय विद्यापीठ, ग्वान्ग्झू, दक्षिण कोरियाचे डॉ. जे. एच. किम, अमिरकबीर विद्यापीठ, तेहरान इराणचे आमीर मोहम्मद अभ्राय, एक्झोनमोबिल कंपनीचे डॉ. अभिजित चौसाळकर, कॉक विद्यापीठ तुर्कीचे डॉ. शशि श्रीवास्तव, अमेरिकेच्या रस्ते परिवहन विभागाचे प्रमुख अभियंता डॉ. स्टीव्हन योन्कीन, आयवा विद्यापीठ अमेरिकेचे सीन रसेल, मलेशिया विद्यापीठ, मलेशियाच्या डॉ. साथियाबामा थीरुनाना, पॅसिफिक राष्ट्रीय प्रयोगशाळा वॉशिंग्टन, अमेरिकेचे संशोधक डॉ. हिमांशू शर्मा, डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या (पुणे) प्रा. नीलम पाटील, उस्मानाबादचे डॉ. हेमंत भगवान आदी निमंत्रित तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचे 'एनआयआरएफ' मानांकन स्थिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** केंद्र सरकारने देशातील विविध शैक्षणिक संस्था, विद्यापीठांचे 'नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेम'चे (एनआयआरएफ) मानांकन गुरुवारी जाहीर केले. त्यातील विद्यापीठांच्या यादीतील १०१-१५० रँक बँडमध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश आहे. गेल्या वर्षीदेखील विद्यापीठ याच रँक बँडमध्ये होते.

अध्यापन-अध्ययन पद्धती, रोजगार उपलब्धता, निधी खर्चाचे प्रमाण, पेटंट, परदेशांतील विद्यार्थ्यांचे प्रमाण, आदी विविध निकषांच्या आधारे मूल्यांकन करून मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून मानांकन जाहीर करण्यात आले आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाला १०१-१५० रँक बँड असे मूल्यांकन मिळाले आहे. दरम्यान, गेल्या वर्षीही विद्यापीठाचे हाच रँक बँड होता. त्यामुळे विद्यापीठाचे मानांकन स्थिर राहिले असल्याचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले. विद्यापीठाने यावर्षी 'नॅक' मूल्यांकनाच्या तयारीवर लक्ष केंद्रित केले. त्यात शिक्षणपद्धती, संशोधन, उद्योगक्षेत्राशी संपर्क, शिक्षणासाठी परराज्य आणि देशातून येणारे विद्यार्थी, मार्गदर्शन करण्यासाठी येणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण आणि पेटंट वाढविण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

Kolhapur Main
Page No. 8 Jun 12, 2020
Powered by: erelego.com